## पिंपळनेर येथील पंधरावी

# विषमता निर्मुलन परिषद

**सल्लागार–**

डॉ. बाबा आढाव (पुणे)
प्रा. ना. य. डोळे (लातूर)

**सभासद–**

डॉ. नरेन्द्र दाभोळकर (
गजानन खातु (मुंबई)
नागेश चौधरी (नागपूर)
वाहरू सोनवणे (शहादे)
मेधा पाटकर (धुळे)
अजित सरदार (पुणे)
सुभाष लोमटे (औरंगाबाद)
अन्वर राजन् (पुणे)
श्रावण देवरे (धुळे)

प्राचार्य जी. आर. भावसार
निमंत्रक, स्वागत समिती

**कार्यालय–**

जी. आर. भावसार
प्राचार्य, कर्मवीर आ. मा. पाटील
महाविद्यालय, पिंपळनेर
ता. साक्री जि. धुळे
PIN 424 306

श्रावण देवरे
सत्यशोधक मुद्रणालय
शिवाजीनगर, वाडी–भोकर रोड,
धुळे. ४२४००२

जा. क्र. दि. ८-८-९३

– श्रावण

प्रिय साथी, ~~–––~~ अजित सरदार

स. न.

विषमता निर्मुलन संयोजन समितीच्या दि. ३१ जुलै ९३ च्या पुणे बैठकीचे निमंत्रण आपणास मिळाले असेलच या बैठकीत आपण नव्या परिस्थितीत पुढील वाटचाल करण्याबाबत विचारविनिमय करणार आहोत.

निमंत्रण पत्रात म्हटले आहे की "परिषदेत होणा–या चर्चेचा पाठपुरावा होत नाही, कृती कार्यक्रमापर्यंत आपण पोचत नाही, अशी सर्वसाधारण प्रतिक्रीया दिसते". परंतु विनिप ने नामांतराला आंदोलन प्रेरणा देऊन महाराष्ट्रातील जातिव्यवस्था विरोधी चळवळीची कोंडी फोडली हे उभा महाराष्ट्र जाणतो. नामांतर लढ्यामुळे दलित व एकूणच पुरोगामी चळवळीला एक नवा आयाम मिळाल नामांतरानंतर मात्र विनिपच्या उपक्रमात शिथिलता यायला लागली. याचे कार नामांतरासारखा दुसरा प्रश्न विनिपसमोर आला नाही. त्यामुळे विनिपचे कार्यक्रम यशस्वी होऊनही घटक पक्ष व संघटना आपआपल्या कामात व्यस्त होणे अपरिहार्य होते.

नामांतर लढ्याचा प्रश्न हा महाराष्ट्रापुरता मर्यादित होता. परंतु आता आता विनिपसमोर ज्या अयोध्या प्रश्नाचे आव्हान उभे राहीले आहे, तो भारतव्यापी असून त्यातुन भारतव्यापी जातीव्यवस्था विरोधी लढ्याला तोंड फोडता येईल. म्हणून, आपण या बैठकीत या विषयावर सविस्तर चर्चा करणे आवश्यक आहे.

अयोध्या प्रश्नाची सोडवणूक करण्याच्या दृष्टीने कॉ. शरद पाटील यांनी जो फार्म्युला मांडलेला आहे तो या पत्रासोबत जोडलेला आहे. मुसलमान नेत्यांनी पंतप्रधानांना भेटून बाबरी मशीद तिच्या जागेवरच बांधायची मागणी सादर केल्याने मौलाना वहिदुद्दीन यांचा फार्म्युला बाद झाला आहे. त्यामुळे कॉ.– शरद पाटील यांचाच पर्याय समोर दिसत आहे. त्यावर विनिपच्या संयोजनसमितीच्या बैठकीत विचार विनिमय करावा अशी मी विनंती करतो.

हा फार्म्युला बैठकीने मान्य केला तर त्याच्या अंमलबजावणीसाठी काय कार्यक्रम आखायचा हे बैठकीत ठरवता येईल.

आपला

(signature)

[श्रावण देवरे]
सदस्य, विषमता निर्मुलन
समिती, महाराष्ट्र

पत्ता–
प्रा. श्रावण देवरे
७/ब, किरण सोसायटी
नकाणें रोड, देवपूर,
धुळे–४२४००२]